दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २२९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.१४ नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

## सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दुर्लक्षामुळे

# पनवेल शासकीय विश्रामगृह समस्यांच्या विळख्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहराजवळून जाणाऱ्या पंचमुखी मारुती मंदिराजवळ असलेले शासकीय विश्रामगृह हे सध्याच्या स्थितीला अनेक समस्यांच्या गर्तेत असून येथे येणाऱ्या मंत्री, आमदार, खासदारांसह शासकीय अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

मुंबईकडून पुण्याच्या दिशेने किंवा कोकणात जाण्यासाठी महामार्गालगत असलेले शासकीय विश्रामगृह हे अनेकांचे विश्रांती घेण्याचे ठिकाण होते. अनेक केंद्रीय व राज्यमंत्री तसेच विविध आमदार, खासदार, शासकीय अधिकारी, कर्मचारी, पत्रकार येथे थांबतात. कित्येक वेळा शासकीय बैठकाही होतात. पत्रकार परिषदही होतात.



परंतु गेल्या काही वर्षापासून या शासकीय विश्रामगृहाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्णतः दुर्लक्ष केल्याने पुर्वीची असलेली रया आता निघून गेली आहे. याची बांधणी साधारण १९१० च्या सुमारास झाली आहे. अत्यंत जुने बांधकाम व त्या काळात असलेले लाकूड, दगडे व इतर साहित्याच्या माध्यमातून येथे उभारणी करण्यात आली आहे. दोन व्हीआयपी कक्ष, सभागृह व साधी निवासस्थान व मागील बाजूस शौचालय, बाथरुम व किचन अशा स्वरु-पाचे हे विश्रामगृह असले तरी या विश्रामगृहाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. अनेक ठिकाणी लाकूड व भिंतीला वाळवी लागली आहे. बैठकांचे कुशण निघाले आहेत. चादरी, उशांची अभ्रे फाटलेली आहेत. त्यात ढेकुणांचा सुळसुळाट आहे.

तसेच सभागृहात असलेल्या खुर्च्या सुद्धा गायब झाल्या असून राष्ट्रीय नेत्यांचे फोटो सुद्धा धुळखात पडले आहेत. या ठिकाणी असणारे खानसामे सुद्धा आजारी अवस्थेत असल्याने येथे आवश्यक असणारी कुठलीही सोयी सुविधा उपलब्ध नाही आहे.

कोकण तसेच घाट माथ्यावर जाणाऱ्या मार्गावरील मुख्य विश्रामगृह असल्याने त्याची जास्तीत जास्त चांगली सोयी सुविधा व उभारणी होणे गरजेचे असतानाही सार्वजनिक बांधकाम खात्याकडून थातुरमातूर कामे केली जात असल्याने येथे येणारे संताप व्यक्त करीत आहेत. पनवेल आज चोहोबाजूने वाढत असल्यामुळे शासकीय विश्रामगृह सुद्धा चांगल्या पद्धतीचे व सर्व सोयीसुविधायुक्त असणे गरजेचे असतानाही या ठिकाणी संबंधित विभाग दुर्लक्ष करीत असल्याने सर्वांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# ब्राईड ईर्व्हरमेन्ट सोल्युशन कंपनीला भीषण आग

**दै.रायगड नगरी । खोपोली**


खोपोली पाली रोडवरील ब्राईड ईर्व्हरमेन्ट सोल्यशन कपंनीला भीषण आग, मिळालेल्या माहिती नुसार मध्यरात्रीच्या सुमारास भिषण आग लागली, सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झालेली नाही. उबंरे गावच्या हद्दीत असलेल्या ब्राईट ईव्हरमेटं सोल्युशन कपंनीला लागलेल्या आगीमध्ये गोडाऊन पुर्णपणे जळुन खाक तर प्लाटंचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

कपंनीच्या आवारातच कामगार राहत असल्याने आगीचे प्रमाण पाहता लवकरात लवकर आग आटोक्यात आणणे गरजेचे होते.खोपोली फायर ब्रिगेड टिम, प्रसोल केमिकल फायर ब्रिगेड टिम, गोदरेज कपंनीची फायर फायटिगं टिम ने तारे वरची कसरत करून पाच तासाच्या अथक प्रयत्नानतंर आगीवर नियत्रंण मिळविले. मात्र तरी गोडाऊन ला लागलेली आग मात्र धुमसत होती. प्लास्टीकवर प्रक्रीया उद्योग असल्याने मोठ्या प्रमाणात आग पसरली. कपंनीच्या जवळुन गेल ईडिंयाची पाईप लाईन जात असल्याने गेल ईडिंयाची फायर फायटिगं टिम सह खालापुर पोलीसही अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठी स्थानिक ग्रामस्थ घटनास्थळी हजर झाले.



## संक्षिप्त...

### पोलिसांच्या गोळीबारात तब्बल २६ नक्षलवाद्यांचा खात्मा



**गडचिरोली । वृत्तसंस्था**

गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यात आज पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये जोरदार चकमक उडाली आहे. मरभीनटोला गा-वानजीक कोटगुलच्या जंगलात झालेल्या या चकमकीत २६ नक्षलवाद्यांना पोलिसांनी कंठस्नान घातलं आहे.

गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी याबाबत माहिती दिली आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील कोटगुल जंगल परिसरात आज शनिवारी सकाळी पोलिसांचे सी-६० पथक शोध अभियान राबवत होते. यावेळी लपून बसलेल्या नक्षलवाद्यांनी अचानक सी-६० पथकावर गोळीबार सुरू केला. प्रत्युत्तरात पोलिसांनीही आक्रमक पवित्रा घेत गोळीबार केला.

पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात २६ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. पोलिसांनी जिल्ह्यात नक्षलवाद्यांचं कंबरडं मोडण्यास सुरुवात केली आहे. कोटगुलच्या जंगलात फोनचे नेटवर्क नसल्याने जवानांशी संपर्क होत नव्हता. त्यामुळे नक्की किती नक्षलवाद्यांना ठार करण्यात आलं, याबाबतची माहिती मिळत नव्हती. मात्र आता गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी माहिती दिली आहे.

दरम्यान, वरिष्ठ पोलीस अधिकारी या परिसरातील परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत, असंही पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे.

# रायगड जिल्हा परिषदेवरती शिवसेनेचा भगवा फडकणार : ना.उदय सामंत



**दै.रायगड नगरी । पेण**

पेणच्या पॉलीटेक्निक कॉलेजला राज्यातील आदर्श पॉलीटेक्निक कॉलेज बनविणार आहोत. रायगड जिल्ह्यात आगामी होऊ घातलेल्या नगर परिषद व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचा विजय निश्चित आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या शिवतीर्थावर शिवसेनेचा भगवा फडकणारच असून पेण-नागोठणे-सुधागड मतदार संघाचा पुढील आमदार शिवसेनेचाच असेल असा ठाम विश्वास उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पेण येथे आयोजित शिवसेना कार्यकर्ता मेळाव्यात व्यक्त केला.

पेण तालुक्यात शिवसेनेची ताकद दिवसेंदिवस वाढत असून या तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पाचही जागा शिवसेना जिंकेल. विविध उद्योगांमध्ये लागणारे तंत्र शिक्षण देण्याकरिता पेण येथील पॉलीटेक्निक कॉलेजला अद्ययावत करणार असून त्यासाठी निधी कमी पडू देणार नाही. त्यामुळे येथील स्थानिक युवकांना उद्योगांमध्ये रोजगार मिळेल. पेणच्या पॉलीटेक्निक कॉलेजला राज्यातील आदर्श पॉलीटेक्निक कॉलेज बनविणार अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी यावेळी दिली.

गाव तिथे शिवसेना व घर तिथे शिवसैनिक ही संकल्पना राबवून जिल्ह्यात शिवसेनेची ताकद अधिक वाढविणार तसेच शिवतीर्थावर भगवा भडकविण्याचे बाळासाहेबांचे स्वप्न साकार करणार अशी ग्वाही माजी जिल्हा प्रमुख विष्णूभाई पाटील यांनी यावेळी दिली. वडखळ विभागात येऊ घातलेल्या एमआयडीसी प्रकल्पाला स्थानिक ग्रामस्थांचा विरोध असून शिवसेना जनते सोबत असल्याचे संजय जांभळे यांनी आपल्या भाषणात जाहीर करत, यापुढे सर्व हेवेदावे बाजूला ठेऊन सर्वांनी शिवसेना वाढीसाठी काम करण्याचे आवाहन केले.

या मेळाव्याला उच्च व तंत्र शिक्षण मंत्री .../२

# रायगड जिल्ह्याच्या वैद्यकीय महाविद्यालयास राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडून मान्यता

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

अलिबाग येथिल शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज माणगांव शासकीय विश्रामगृह या ठिकाणी आयोजित पत्रकार परिषदेत महत्त्वाची माहिती दिली. एका बाजुला कोरोनाच संकट असतानाही मेडिकल कॉलेजच पाहिलेल स्वप्नं कुठे ही मागे पडता कामा नये यासाठी गेले एकदोन वर्ष सातत्याने पाठपूरावा करून राज्य शासना कडून केंद्राला प्रस्ताव पाठवला होता.

त्यानंतर नॅशनल मेडिकल कमिशनचे निरिक्षक पथक आपल्या कडे येऊन गेले आणि काल दि. ११ नोव्हेंबर रोजी त्यांचे फायनल लेटर ऑफ परमिशन (एलओपी) प्राप्त झाल्याने आता अलिबाग येथील मेडिकल कॉलेजची स्वप्नंपूर्ती होत असुन विद्यार्थ्यां साठी १०० जागांच मेडिकल कॉलेज यंदाच्या येत्या वर्षाच्या बॅच पासूनच उपलब्ध होणार आहे. त्यामुळे राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या वेबसाइट वरची पुढल्या वेळची नविन डमिशनची यादी औपचारीक रित्या प्रसिध्द होईल, त्याच्या मध्ये आपल्या रायगडच्या या मेडिकल कॉलेजच ना-वही असेल अस त्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने सांगितले आहे.

तसेच इन्फ्रास्ट्रक्चर साठी आपल्याला सध्या आर.सी.एफ कंपनी चे मोठे सहकार्य लाभल्याचे त्या म्हणाल्या. सिव्हील हॉस्पीटल मध्ये सुध्दा या कॉलेजच्या व्यवस्थापकिय इमारतींचे काम सुरु आहे. पुढे .../२



# कर्जत एस.टी. आगारात कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय आंदोलनात



**दै.रायगड नगरी । कर्जत**

राज्य परिवहन महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलीनीकरण व्हावे आणि थकीत अनुदान, भत्ते याबाबत एसटी कामगार संघटना यांनी कामबंद आंदोलन केले आहे. कर्जत एसटी आगारातून मागील सहा दिवसात एकही एसटी गाडी बाहेर पडू शकली नाही. सर्व कामगार संघटनेचे सदस्य यांनी कामबंद आंदोलन केले असून सहाव्या दिवशी कामगारांना पाठिंबा देण्यासाठी सर्व कामगारांचे कुटुंबीय आंदोलनात सहभागी झाले असून त्यात महिला, विद्यार्थी यांची उपस्थिती लक्षणीय आहे.

कर्जत तालुका एसटी आ-गार सोमवार पासून प्रवासी वाहतुकीसाठी बंद आहे.राज्य परिवहन महामंडळाचे राज्य सरकार मध्ये विलीनीकरण व्हावे आणि प्रलंबित मागण्यांसाठी कामगारांनी कामबंद आंदोलन सुरू केले आहे. कर्जत एसटी आगारातील सर्व चार कामगार संघटना या आंदोलनात सहभागी झाल्या .../२

# भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील आज पनवेलमध्ये

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी उपमहापौर, नगरसेवक विक्रांत बाळासाहेब पाटील यांच्या जनसेवा कार्यालयाचे आज (रविवार दि.१४ नोव्हेंबर) उद्घाटन करण्यात येणार आहे.

रविवारी सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणून माजी मंत्री आमदार रवींद्र चव्हाण, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी कोकण म्हाडा सभापती बाळासाहेब पाटील, महापौर डॉ.कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, सभापती, नगरसेवक आदीं-सह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पनवेल शहरातील वीर सावरकर चौक मार्गावरील विरुपाक्ष हॉल येथे उद्घाटन कार्यक्रमानिमित्त संवाद कार्यक्रम संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'जनसंपर्क नव्हे; तर जनसेवा कार्यालय' याप्रमाणे मानस ठेऊन विक्रांत पाटील आजपर्यंत सेवाकार्य करीत आले आहेत. आता या कार्यालयाचे नूतन रूप अद्यावत करण्यात आले आहे.

# पथदिव्यांचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी केले उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नगरसेविका सौ.कुसुम गणेश पाटील यांच्या नगरसेवक निधीतून स्व.लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब उद्यान सेक्टर ९, खांदा कॉलनी येथे लावण्यात आलेल्या पथदिव्यांचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी उद्धघाटन केले.

यावेळी यावेळी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह शेकाप पनवेल महापालिका जिल्हा चिटणीस नगरसेवक गणेश कडू, मा.उपनगराध्यक्ष गणेश पाटील, नगरसेवक गोपाळ भगत, नगरसेविका कुसुम पाटील, नगरसेविका सारिका भगत, मा.नगरसेवक शिवाजी थोरवे, कामगार नेते प्रकाश म्हात्रे, शेकाप नेते महादेव वाघमारे, शेकाप शहर अध्यक्ष अनिल बंडगर, ॲड.किरण घरत शिवसेना उपमहानगर प्रमुख लिलाधर भोईर, खांदा कॉलनी उपशहर प्रमुख संपत सुवर्णा, शाखा प्रमुख मंगेश पवार, सुशांत सावंत, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक संस्थेचे महेंद्र कांबळे आणि श्याम लगाडे तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, खांदा कॉलनी येथील विविध सोसायटी मधील पदाधिकारी, जेष्ठ नागरिक उपस्थित होते.



# सम्राटपदाची द्वाही!

आणखी काही वर्षांनी अमेरिकेला मागे टाकून जगात पहिल्या क्रमांकाची महासत्ता चीन असणार आहे आणि या महाबलाढ्य चीनचे आपण आमरण सम्राट असणार आहोत, असे शी जिनपिंग यांनी जगाला व चीनमधील आपल्या छुप्या विरोधकांना एकदमच सांगितले आहे. भारतासाठी ही चांगली बातमी नाही. उलट, जोवर शी जिनपिंग जिवंत आहेत किंवा पदच्युत होत नाहीत; तोवर भारत–चीन सीमा शांत राहणार नाही. किंबहुना, चीनच्या मते भारताच्या ताब्यात असणारा एखादा त्यांचा भूभाग गिळंकृत करण्याचा आटापिटा शी केल्याशिवाय राहणार नाहीत. चीनमध्ये पहिली सांस्कृतिक क्रांती घडविणारा माओ, दुसरी व महत्त्वाची अशी अर्थक्रांती घडविणारे डेंग झिआओ पिंग या दोन महान नेत्यांच्या पंक्तीत आपले सिंहासन शी जिनपिंग यांनी नेऊन ठेवले आहे. त्यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या अधिवेशनात केवळ आपली अध्यक्षपदाची तिसरी खेप मंजूर करून घेतली नाही, तर त्यांची इच्छा असेपर्यंत, म्हणजे खरे तर मरेपर्यंत कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्व आपल्या हातून जाणार नाही, अशी तजवीज करून ठेवली आहे. माओ त्से तुंग आणि डेंग झिआओ पिंग यांच्या बरोबरीचे तिसरे महत्त्वाचे चिनी सत्ताधीश असे त्यांना आज मानले जातेच. पुढील काळात या दोघांना मागे टाकण्याची शी यांची महत्त्वाकांक्षा अनेक रूपांनी प्रत्यक्षात येताना दिसेल. कोणत्याही चिनी नेत्याप्रमाणे शी हे जात्याच विस्तारवादी आहेत. माओने 'जुन्या चीनचे एकत्रीकरण' या गोंडस नावाखाली तिबेटचा घास घेतला होता. शी यांना आता तैवानचा घास घ्यायचा आहे. शक्य झाले, तर भारताचे भौगोलिक लचके तोडणे आणि पाकव्याप्त काश्मिरात तळ ठोकणे, हाही या विस्तारवादाचा एक भाग असणार आहे. चीनचा हा विस्तारवाद तैवान आणि भारत यांच्याशिवाय इतरही अनेक देशांना त्रासाचा ठरेल. शी यांच्यासमोर दुसरे उद्दिष्ट आहे, ते म्हणजे चीनची आर्थिक ताकद इतकी प्रचंड वाढवायची की त्यासमोर अमेरिका, सोव्हिएत युनियन, भारत यांच्यासहित सारे जग निष्प्रभ झाले पाहिजे. चीनने याची सुरुवात याआधीच केली आहे. आशिया आणि आफ्रिका खंडातील गरीब देशांवर मोहजाल टाकून त्यांना कायमचे अंकित किंवा मांडलिक करणे, या खेळाला शी यांनी गेल्या दशकभरात प्रचंड वेग दिला आहे. तो खेळ ते आता नव्या जोमाने खेळतील. करोनोत्तर काळात जगाची फेरमांडणी होईल आणि तीत चीनचा प्रभाव मोडून काढला जाईल, अशी चर्चा जगभर होते आहे; मात्र चीनने आर्थिक आघाडीवर जगातल्या बहुतेक देशांमध्ये ठाण मांडले आहे. ते हुसकावून लावणे, दिसते तितके मुळीच सोपे नाही. शी यांचे तिसरे आणि सगळ्यांत महत्त्वाचे उद्दिष्ट आहे, साऱ्या जगाला 'चिनी समाजवाद आणि चिनी संस्कृतीची' ओळख करून देणे. चीनचा पाश्चात्य पद्धतीच्या लोकशाही व्यवस्थेवर विश्वास नाही आणि साऱ्या जगाचे भले व्हायचे असेल, तर जगात चिनी पद्धतीचीच राजवट व राज्यव्यवस्था हवी, असे चीनला वाटते. शी यांच्या काळात अशी असंख्य प्रकाशने जगातल्या सर्व प्रमुख भाषांमध्ये प्रकाशित करण्यात आली आहेत. जास्तीत जास्त भूप्रदेश, जगातील एकमेव बलाढ्य महासत्ता आणि साऱ्या जगावर चिनी संस्कृतीचे अधिराज्य असा शी यांच्या महत्त्वाकांक्षेचा क्रम आहे. सध्या ते यात बरोबर मध्यावर आहेत आणि पुढचा प्रवास कमालीचा चढणीचा व त्यांचे वय उतारावर आहे. चीनमध्ये शी यांच्या सम्राटपदाची अशी द्वाही फिरवली जात असताना जग शांत बसणे शक्य नाही; मात्र चीन हा भारताचा शेजारी आहे आणि गेल्या काही वर्षांमध्ये संबंधांमधला ताण वाढतो आहे. आशिया–प्रशांत क्षेत्रात नव्याने शीतयुद्ध सुरू होऊ नये, असा इशारा शी यांनी नुकताच दिला आहे. ते काही असले, तरी दक्षिण आशिया पुढची निदान दोन ते तीन दशके शांत राहण्याची शक्यता शी यांच्या नव्या राज्यारोहणामुळे चांगलीच उणावली आहे. चीनला 'आपली लोकशाही' जशी खरी वाटते; तसाच 'आपला गौतम बुद्ध आणि बौद्ध धर्म'च खरा वाटतो. गेल्या काही काळात शी यांनी या सांस्कृतिक लढाईत चिनी बुधिझमला उतरविले आहे. या साऱ्याचा सारांश, जगावर अनेक अर्थांनी प्रभाव टाकण्याच्या शर्यतीत आता पुढची लढाई भारत आणि चीन अशी असणार आहे. या लढाईचे आविष्कार केवळ लडाखमधल्या रणांगणात होणार नाहीत, तर प्रयोगशाळांपासून अंतराळापर्यंत सर्वत्र होणार आहेत. शी यांच्या सर्वभक्ष्यी आणि सर्वस्पर्शी आक्रमणाला अमेरिकेसहित अनेक देशांची साथ घेऊन अडसर लावण्याचे काम भारताला पुढील काही दशकांत करावे लागणार आहे. ते देशाच्या आणि जगाच्याही अंतिम हिताचे आहे; मात्र ही जबाबदारी सोपी नाही.

# श्रीवर्धन नगरपालिका : अग्निशमन शिग्र प्रतिसाद वाहनाचे ना. आदिती तटकरे यांच्या हस्ते लोकार्पण



**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या अग्निशमन व शिग्र प्रतिसाद वाहनाचे उद्घाटन पालकमंत्री आदितीताई तटकरे यांच्या हस्ते श्रीवर्धन नगरपरिषद येथे पार पडले. यावेळी तालुकाध्यक्ष दर्शन विचारे नगराध्यक्ष फैसल हूर्जूक उपनगराध्यक्ष यशवंत चौलकर शहरअध्यक्ष जितेंद्र सातनाक आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अग्निशमन शिग्र प्रतिसाद वाहनांच्या साह्याने अपघात किंवा आपत्ती ठिकाणी सहजरीत्या पोहोचता येणार असून आपत्ती व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या विविध प्रकारची यंत्रसामुग्री या वाहनात उपलब्ध आहेत. तालुक्यात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षात घेता. एखादा अपघाताचा प्रसंग ओढवल्यास या वाहनाचा फायदा होणार आहे असल्याचे मत पालकमंत्री ना. आदिती तटकरे यांनी व्यक्त केलं. दोन वर्षे आपण नैसर्गिक आपत्तीचा सामना करीत आहोत. त्यासाठी एक वाहन पुरेसं नव्हतं.

जिल्ह्यात चक्रीवादळ. महापूर. नैसर्गिक आपत्ती. इमारत दुर्घटना. इत्यादी आपत्तीच्या घटना घडत असतात. आज उपलब्ध होत असलेले वाहन कोणत्याही आपत्तीला सामोरे जाण्यासाठी हे वाहन उपलब्ध करून दिल्याचे सांगितले. तसेच जिल्ह्यात कोणतीही आपत्ती आल्यास अत्याधुनिक सुविधा असलेले हे वाहन वापरता येईल.

यावेळी श्रीवर्धन नगरपरिषदेला आव्हान करीत उपलब्ध झालेल्या वाहनाची चांगली देखभाल व मेंटेनेस करावे.तसेच वाहन उभे करण्यासाठी लागणाऱ्या शेडची उपलब्धता लवकरच करणार असल्याचे सांगितले.लोकार्पण कार्यक्रमानंतर नाम अदितीताई तटकरे यांनी डिजिटल लायब्ररीचा प्रत्यक्ष जाऊन आढावा घेतला तसेच इनडोअर स्टेडियम बाबत चर्चा केली.

# जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रम अंतर्गत मोफत नेत्र तपासणी शिबिर

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी विस्थापित हनुमान कोळीवाडा गावात ७५ वा आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रम अंतर्गत निमित्ताने हनुमान कोळीवाडा गा-वात मोफत नेत्र तपासणी शिबिराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदरच्या कार्यक्रमाला गावातील जेष्ठ नागरीक, महिलावर्ग, आणि तरुणांनी शिबिरात भाग घेऊन नेत्र तपासणी केली.

तसेच जेएनपीटीचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ हे विस्थापित हनुमान कोळीवाडा गावासाठी सातत्याने नागरीसुविधा गावासाठी देत असतात किंवा इत्तर सुविधा असो गावचे सरपंच




परमानंद कोळी हे नेहमीच जेएनपीटी चे उपाध्यक्षांकडे गावाच्या अडी अडचणी लेखीस्वरूपात मांडून गावासाठी काहीना काही प्रयत्न करत असतात असे सांगितले. दिनांक ३/११/२०२१ रोजी गावचे सरपंच परमानंद कोळी यांनी जेएनपीटी चे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांच्या सोबत बैठक घेऊन गावांच्या विविध प्रलंबित प्रश्नावर चर्चाकरून ग्रामपंचायत टॅक्स, थकीत पाणीबील आणि तरुणाचे नोकरीच्या प्रश्नावर सकारात्मक विचार केला आणि गावातील सर्व विकासकामे जेएनपीटी मार्फत पुर्ण करू असे सांगितले. नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन गावचे सरपंच परमानंद कोळी यांचा शुभहस्ते करण्यात आले.

जेएनपीटीचे कामगार राज कदम, जे के म्हात्रे, प्रविण कोळी, हरेश कोळी, नरेश कोळी, जयदास कोळी, जे. डी. कोळी आणि गावचे अध्यक्ष सुरेश कोळी, मंगेश कोळी,रामकृष्ण नेत्रालय सी बुड नवी मुंबई हॉस्पीटलचे डॉ. विशाखा मॅडम, राज मिश्रा,मार्केडींग हेड डॉ काजल कदम, सचिन ठाकूर, सिदेश गायकवाड आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

सदरचे नेत्र तपासणी शिबिर कार्यक्रम जेएनपीटीने आयोजित केल्याने ग्रामस्थांनी आणि गामपंचायती तर्फे जेएनपीटीचे आभार मानण्यात आले.

# संभे ते आळंदी पायीवारी दिंडी सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

गेली २१ वर्षांची यशस्वी परंपरा राखत याही वर्षी रोहे तालुक्यातील संभे ते आळंदी पायीवारी दिंडी सोहळ्याचे आयोजन सोम.दि.२२ नोव्हें.ते शुक्र. दि.३ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

स्वा. सु. गुरूवर्य अलिबागकर महाराज यांच्या कृपात्राखाली व स्वा. सु. गुरूवर्य गोपाळबाबा वाजे यांचे आशिर्वादाने व ह.भ.प.नारायण महाराज दहिंबेकर व ह.भ.प. नारायण महाराज महाबळे यांच्या संकल्पनेतून सदर पायीवारी दिंडी सोहळा गेल्या २१ वर्षाची यशस्वी परंपरा राखत चालू आहे. तर दिंडीचे उगमस्थान भैरीनाथ मंदिर मु.संभे–कोलाड हे असून येथून भाविक भक्त व भगिनींच्या उपस्थितीत सदर दिंडीचे आळंदीकडे प्रस्थान होणार आहे. तर दहा दिवसाचे दिंडी सोहळ्यात दररोज अखंड नामस्मरण, हरिपाठ, भजन,प्रवचन व किर्तनसेवा आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम नित्यनेमाने संपन्न होणार असून सर्व शासकीय कोरोना नियमावलीचे पालन करण्यात येणार असल्याचे व दिंडी सोहळ्याचे यशस्वीतेसाठी अध्यक्ष तुकाराम बांदल, उपाध्यक्ष अनंत सानप, सचिव पांडुरंग सानप, गणेश नलावडे, खजिनदार जितेंद्र दहिंबेकर, दत्ता तेलंगे आदी पदाधिकारी मंडळीसह सर्व सदस्य व श्री.संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सत्संग वारकरी सेवा मंडळ संभे, ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच वीर हनुमान क्रीडा मंडळ संभे मेहनत घेत आहेत. अशा प्रकारची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

# खिडकाळी शिवमंदिर परिसराचे रूप पालटणार, ५ कोटी निधी मंजूर

**दै.रायगड नगरी । ठाणे**

कल्याण लोकसभा मतदारसंघातील अंबरनाथ येथील प्राचीन शिवमंदिराच्या सुशोभीकरणासाठी सुमारे ४३ कोटींचा भरघोस निधी प्राप्त करून घेतल्यानंतर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने आता शिळफाट्यालगत देसाई गाव येथील खिडकाळी शिव मंदिर आणि परिसराचे सुशोभिकरणासाठी ५ कोटी रूपयांचा निधी जाहीर करण्यात आला आहे. खिडकाळी येथील शिवमंदिराचा तीर्थ क्षेत्राच्या धर्तीवर विकास करण्यासाठी डॉ. श्रीकांत शिंदे प्रयत्नशील होते. ५ कोटींचा निधी उपलब्ध झाल्याने खिडकाळीच्या शिवमंदिर परिसराचे रूपडे पालटणार आहे.

ठाणे जिल्ह्यात स्वयंभू शिवलिंग असलेल्या शिवमंदिरांमध्ये अंबरनाथचे शिवमंदिर आणि देसाई गावाजवळील खिडकाळी शिवमंदिराचा उल्लेख सापडतो. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे मंदिरांच्या रूपाने मतदारसंघात असलेल्या प्राचीन वारशाला टिकवून ठेवण्यासाठी कायम आग्रही असतात. त्यातूनच काही महिन्यांपूर्वी अंबरनाथ येथील प्राचीन शिवमंदिराच्या विकासासाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून ४३ कोटी रूपयांचा भरघोस निधी उपलब्ध करून देण्यात त्यांना यश आले. त्यामुळे लवकरच पुरातत्व खात्याच्या मार्गदर्शनाखाली आणि देशातील अग्रगण्य आरेखकांच्या मदतीने शिवमंदिराच्या सुशोभीकरणाचे काम सुरू केले जाणार आहे. अंबरनाथमधील शिवमंदिरानंतर कल्याण लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या देसाई गावाजवळील खिडकाळी येथील प्राचीन शिवमंदिराची ओळख आहे. खिडकाळी येथील हे शिवलिंग स्वयंभू आहे. या शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक दरवर्षी येत असतात. तसेच महाशिवरात्री उत्सवाच्या दरम्यान काशी,अयोध्या,उत्तराखंड येथून साधू संत येते वास्तव्यास येतात. स्वामी शिवानंद महाराज यांनी १९३४ मध्ये येथे समाधी घेतली असून खिडकाळी मंदिर हे भाविकांसाठी तीर्थस्थान आहे. तसेच खिडकाळी मंदिरास तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळण्यासाठी सदर ट्रस्टमार्फत मागणी देखील केली आहे. खिडकाळी येथील शिवमंदिरास तीर्थ क्षेत्राचा दर्जा मिळवण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी राज्याचे पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडे मागणी केली होती. शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास व पर्यटन संबंधी विविध योजनांमार्फत या मंदीराचा तसेच आजूबाजूच्या परिसराचा विकास होईल आणि भविष्यात एक उत्तम तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ म्हणून नावारूपाला येईल त्यामुळे यासाठी भरघोस निधी मिळावी यासाठी नगरविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे डॉ. श्रीकांत शिंदे यांनी निधी देण्याची मागणी केली होती. या मागणीला अखेर यश आले असून नगरविकास विभागातर्फे खिडकाळी शिवमंदिराच्या आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी ५ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमुळे खिडकाळी येथील शिवमंदिर आणि परिसराचे रूप पालटणार आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## रायगड जिल्हा परिषदेवरती शिवसेनेचा भगवा फडकणार : ना.उदय सामंत

उदय सामंत, शिवसेना जिल्हाप्रमुख आमदार महेंद्र दळवी, उपजिल्हा प्रमुख नरेश गावंड, माजी जिल्हा प्रमुख विष्णुभाई पाटील, माजी अर्थ व बांधकाम सभापती संजय जांभळे, संपर्क प्रमुख विलास चावरी, राजिपचे विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, पेण तालुका प्रमुख अविनाश म्हात्रे, उपतालुका प्रमुख भगवान पाटील, राजु पाटील, शहर प्रमुख सुधाकर म्हात्रे, माजी उपजिल्हाप्रमुख शैलेश पाटील, महिला आघाडीच्या दिपश्री पोटफोडे, उद्योजक रशाद मुजावर, चेतन मोकल, ओंकार दानवे, अंजली जोगळेकर आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रायगड जिल्ह्याच्या वैद्यकीय महाविद्यालयास राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडून मान्यता

येथुनच कॉलेजचे डिन व मेडिकल स्टाफ सर्व कारभार पाहतील. तसेच येथिल इतर १५ ते १६ कोटी च्या कामांसाठी मंजुरी मिळाली असल्याचे त्यांनी म्हटले. पुढील विकासात्मक दृष्टीकोनातुन कॉलेजसाठी उसर अलिबाग येथे प्रशस्त ५३ एकर जागा मिळाली असुन पुढील कॉलेजच्या नविन इमारत बांधकामासाठी ३५ एकर जागा लागणार व उर्वरीत वाढीव २० एकर जागेत भविष्यात नर्सिंग व आयुर्वेदिक कॉलेज साठी जागा सहजी उपलब्ध राहील. यावेळी रायगड जिल्हा माहीती अधिकारी मनोज सानप, माणगांवच्या प्रांताधिकारी प्रशाली दिघावकर, तहसिलदार प्रियंका आयरे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष सुभाष केकाने व माणगांवचे पत्रकार उपस्थित होते.

## कर्जत एस.टी. आगारात कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय आंदोलनात

असल्याने सोमवार पासून एकही एसटी गाड्या प्रवाशांच्या सेवेत निघाली नाही. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत असून आपल्या मागण्या सरकारने मान्य कराव्यात यासाठी कामगार आंदोलनावर ठाम आहेत. दोन दिवस कर्जत आगारातील कामगार मुंबई येथील आझाद मैदानात सुरू असलेल्या आंदोलनात सहभागी झाले होते. मात्र सरकार कडून मागण्या मान्य होत नसल्याने कामगारांनी आंदोलन आणखी तीव्र केले आहे. आज १३ नोव्हेंबर रोजी कर्जत एसटी आगारात कामबंद आंदोलन करणाऱ्या ९३ कामगार यांच्या पाठीशी त्या कामगारांचे कुटुंबीय समर्थन देण्यासाठी उतरले.कर्जत मध्ये निवासी असलेल्या कामगारांचे कुटुंबीय हे आज सकाळ पासून आंदोलनात सहभागी झाले आहेत. त्यात महिला आणि विद्यार्थी यांचा समावेश असून सर्व कामगारांचे कुटुंबीय आंदोलन असेच सुरू राहिल्यास धडक आंदोलन करणार आहेत.

# सहाव्या दिवशी संप सुरूच : दबाव तंत्र व निलंबन कारवाई बाबत मुरुडच्या एस टी कर्मचाऱ्यांचे निवेदन



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शासनात विलिनीकरण व्हावे यासाठी सुरू असलेल्या एस.टी.कर्मचा–यांच्या संपाला आज सहावा दिवस असून विलिनीकरणाच्या मुद्द्यावर कर्मचारी ठाम आहेत. विलिनीकरण मुद्द्यावर संपात सामील कामगारांवर दबाव आणला जात असल्याबद्दल मुरुडच्या एस टी कर्मचा–यांच्या वतीने आगार प्रमुखांना निवेदन सादर करण्यात येऊन आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

त्यांनी याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, मुरुड आगारातील कर्मचारी आपल्या स्वेच्छेने विलिनीकरणाच्या मुद्द्यावर संपामध्ये सहभागी झालो आहोत. सदर संप महाराष्ट्र शासन विरोधात असून रा.प.प्रशासनाच्या विरोधात न लढता सरकार विरोधात लढत आहोत. असे असताना आपल्या आगारातील स.वा.नि.भोसले कामगारांवर कामगिरी करण्याकरिता दबाव आणत आहेत. त्यांच्या कडून होत असलेल्या दबावामुळे कर्मचा–यांनी त्यांच्या जिवाचे बरे वाईट केल्यास सर्वस्वी स.वा.नी तसेच आगार प्रशासन जबाबदार राहील.याची नोंद घ्यावी.आम्ही शांततेत व अहिंसेच्या मार्गाने संप करीत असल्याचे व सहकार्याचे आवाहन कर्मचा–यांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आले असून सदर निवेदनाच्या प्रती मुरुड तहसीलदार, पोलीस निरीक्षक व विभाग नियंत्रक रायगड–पेण यांना देण्यात आल्या आहेत.

मुरुड मधील १८० कर्मचारी शासनात विलिनीकरण मुद्द्यावर संपात सहभागी झाले आहेत.संपकरी कर्मचा–यांपैकी सर्वांवर कारवाई न करता तीन जणांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याबद्दल अर्थपूर्ण रित्या संशय व्यक्त केला जात आहे.आंदोलनात सहभागी सर्व कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्याबाबतही आज कर्मचा–यांच्या वतीने आगार व्यवस्थापक यांच्या मार्फत राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब, कामगार आयुक्त व राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक–पेण यांना निवेदन देण्यात आले आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या मुरुड आगारातील सर्व कर्मचारी दि.८ नोव्हेंबर पासून राज्य परिवहन महामंडळाचे शास-नात विलिनीकरण करण्यासाठी राज्यातील इतर सर्व आगारातील व इतर प्रशासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यां सोबत पुकारण्यात आलेल्या कामबंद/संप आंदोलनात सहभागी आहोत. या संपूर्ण आंदोलनात आम्ही सर्व कामगार एक मताने व सहमताने कामबंद आंदोलन केलेले आहे.यात आम्ही सर्व कर्मचाऱ्यांचा तेवढाच व पुर्ण सहभाग व सदर कामबंद संपास आम्ही तेवढेच जबाबदार असून जर आपल्याकडून निलंबनाची कार्यवाही होत असेल तर आम्हा सर्व कर्मचाऱ्यांवर एकत्रितपणे करण्यात यावी.जर निलंबित केलेल्या कर्मचा–यांची मानसिक दबावामुळे स्वत:च्या जिवाचे काही बरेवाईट करून घेतल्यास त्यास सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील.असे मुरुड आगारातील चालक– वाहक/ चालक तथा वाहक यांत्रिकी व प्रशासकिय कर्मचारी यांच्या तर्फे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले असून सदर निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी–रायगड, राज्य परिवहन महामंडळाचे विभागीय कर्मचारी अधिकारी, आगार व्यवस्थापक यांना देण्यात आल्या आहेत.

# म्हसळा शहरातील बेकायदेशीर गतिरोधक अखेरीस हटवले

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

नागरिकांची मागणी नसताना आठवड्यापुर्वी शहरातील डांबरी करण असलेल्या अर्ध्याअधिक किमी रस्त्यावर सात ठिकाणी सिमेंट काँक्रीटचे विचित्र प्रकारे गतिरोधक टाकण्यात आले होते.अर्धवट असलेल्या या गतिरोधकांमुले अपघात टाळण्या ऐवजी अपघात घडण्यास कारणीभूत ठरू लागले. दोन दिवसांत शहरात दोन बाईक स्वरांचा अपघात होऊन एका युवकास त्याच्या पायाची करंगळी गमवावी लागली आहे.

मुख्य रस्त्यावर अर्धवट स्वरूपाचे गतिरोधक टाकण्यात आल्याने शहरातील नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

गतिरोधक तातडीने हटविण्यात यावे यासाठी शहरातील युवा कार्यकर्ते समीर फिरफिरे,आकीब जहांगीर,सुफीयान हलदे यांनी उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,म्हसळा नगर पंचायत,तहसीलदार आणि पोलिस प्रशासन यांना लेखी पत्र देवुन गतिरोधकची गंभीरता लक्षात आणुन दिली असता त्याची तातडीने दखल घेऊन लागलीच हटविण्यात आले असल्याने म्हसळे वासीयांनी समाधान व्यक्त केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## म्हसळा शिवसेना तालुका प्रमुखपदी सुरेश कुडेकर यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

माजी तालुका प्रमुख महादेव पाटील यांनी राजीनामा दिला असता त्यांच्या रिक्त असलेल्या तालुका प्रमुख पद–ावर म्हसळा शहरातील जेष्ठ शिवसैनिक सुरेश कुडेकर यांची तालुका प्रमुखपदी नियुक्ती झाली आहे. शिवसेना पक्षप्रमुख तथा मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशानुसार त्यांची नियुक्ती करण्यात आली.

अनेक दिवसांपासून म्हसळा तालुका शिवसेना पक्षात निर्माण झालेली मरगळ, गटबाजी यातून पक्षाला सावरण्याचे मोठे आव्हान नवनियुक्त तालुका प्रमुखांच्या खांद्यावर असणार आहे. सुरेश कुडेकर हे अनेकवर्षापासून राजकिय, सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहेत. शिवसेना उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, ग्राम पंचायत सदस्य पदी काम केले आहे. गेल्या अनेक वर्षापासून कोणतेही पद नसतांना शिवसेनेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्याकरिता ते कार्यरत असल्याने त्यांच्या याच कामाची पोचपावती म्हणून शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने तालुका प्रमुख पदावर नियुक्ती झाली आहे.

सुरेश कुडेकर यांच्या नियुक्तीने तालुक्यात शिवसेनेला नवसंजीवनी मिळणार असे तालुक्यातील शिवसैनिकांचे म्हणणे आहे. त्यांच्या या नियुक्ती बद्दल दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख अनिल नवगणे, माजी जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, ज्येष्ठ शिवसैनिक भाऊ करडे, माजी तालुका प्रमुख महादेव पाटील, राजाराम तीलटकर, ई कांबळे, शहर प्रमुख अनिकेत पानसरे, गजानन शिंदे, अनिल काप, अमित महामुनकर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



# देशाच्या सागरी क्षेत्रातील विकासाला गती मिळणार : ना.सरबानंद सोनेवाल

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी बंदरात केंद्रीय नौकानयन,जलमार्ग,बंदरे व आयुष मंत्री सरबानंद सोनेवाल यांनी काल भेट दिली.या भेटी दरम्यान केंद्रीयमंत्री सोनेवाल यांनी जेएनपीटी बंदराच्या कामकाजाची व बंदरातील पायाभूत सुविधांची आणि बंदराने केलेल्या तांत्रिक प्रगतीची माहिती जाणून घेतली.सार्वजनिक व खाजगी क्षेत्राच्या भागीदारीमुळे जेएनपीटी बंदराने केलेल्या प्रगतीचा आढावा घेत जेएनपीटीच्या प्रमुख भागधारकांशी संवाद साधला.



या दरम्यान दुपारच्या सत्रात पत्रकार परिषदेत बोलतांना केंद्रीयमंत्री सरबानंद सो–नेवाल यांनी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राच्या भागीदारीमुळे देशाच्या प्रगतीमध्ये कसे परिवर्तन होऊ होऊन देशाचा गतिमान विकास कसा होऊ शकतो यांची माहिती दिली. जगातील बहुतेक सर्व व्यापार हा समुद्रमार्गे होतो. बंदरे ही सर्व उपखंडातील व देशांतर्गत वाहतूक नेटवर्क आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडणारी महत्वाची केंद्रे आहेत. त्यामुळे जेएनपीटी येथील सार्वजनिक व खाजगी भागीदारीमुळे एक सशक्त व प्रभावी सागरी वाहतूक पायाभूत सुविधा विकसित होण्यास मदत होईल.

जेएनपीटीने केलेल्या आयात – निर्यात व्यापार केंद्रित उपाययोजना व सुलभ दळणवळणासाठी केलेल्या जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा देशातील बंदर आधारित औद्योगिक विकासासाठी कशाप्रकारे दिशादर्शक ठरल्या आहेत व त्यामुळे जेएनपीटी हे कशाप्रकारे व्यापारी वर्गाचे पहिल्या पसंतीचे बंदर बनले आहे.याचा उल्लेखही त्यांनी केला. जेएनपीटी आपल्या कामकाजामध्ये सातत्यपूर्ण तांत्रिक प्रगती आणि बहुविध पायाभूत सुविधा विकसित करून देशाच्या बंदर आधारित औद्योगिक विकासाचे नेतृत्व करेल व २०३० पर्यंत एक मेगा बंदर हे बंदर विकसित होईल,असे ना.सोनेवाल यांनी म्हटले आहे.

या निमित्ताने केंद्रीयमंत्री सरबानंद सोनेवाल यांनी कर ळ जंक्शन येथील जेएनपीटी बंदर रोड कॉंक्रीटीकरण प्रकल्पाचे भूमिपूजन केले. त्याच प्रमाणे अत्याधुनिक सेंट्रलाईज्ड पार्किंग प्लाझातील सोयीसुविधांचा आढावा घेतला. सागरी पुरवठा साखळीतील अविभाज्य भाग असलेल्या कंटेनर ट्रक चालकांशीही संवाद साधला. याशिवाय जिटीआय टर्मिनल,हिंद टर्मिनल सिएफएस,बीएमटीसीने हाती घेतलेल्या दुसऱ्या टप्प्यातील प्रगतीचा आढावा घेतला.यावेळी जेएनपीटीचे चेअरमन संजय सेठी,उपाध्यक्ष उन्मेष वाघ,उरणचे आ.महेश बालदी,जेएनपीटीचे वरिष्ठ व्यवस्थापक जयंत ढवळे,मनिषा जाधव कॅप्टन अमित कपूर,सुरेश पाटील,उरण नगरपरिषदचे उपनगराध्यक्ष जविंद्र कोळी,भाजपा तालुका अध्यक्ष रवि भोईर, भाजपा शहराध्यक्ष कौशिक शाह यांच्यासह जेएनपीटी बंदरातील अधिकारी उपस्थित होते.

## फटाक्यांमुळे डोंगरावर लागलेली आग विझविण्यात पर्यावरण प्रेमींना यश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा कारागृह शेजारी असलेल्या डोंगरावर लागलेली आग विझविण्यात पर्यावरण प्रेमींना यश आले. काही तरुणांनी संध्याकाळी डोंगरालगत फटाके फोडल्यामुळे डोंगरावर आग लागली होती. दरम्यान, तरुणांनी वन संपदा नष्ट करण्याऐवजी वाचविण्यासाठी सहकार्य करावे तसेच डोंगरावर फटाके फोडू नयेत, असे आवाहन पर्यावरण प्रेमींनी केले आहे.

खारघर सेक्टर–३५ मधील तळोजा कारागृह लगत असलेल्या डोंगरावर वणवा पेटला. यावेळी डोंगरावर गेलेल्या चार ते पाच तरुणांनी आग विझविण्यास सुरुवात केली. दरम्यान, एका नागरिकाने सदर आगीबाबत खारघर आग्नशमन केंद्राला माहिती दिली. त्यानंतर काही वेळाने आग्नशमन दल जवानांनी घटनास्थळी येवून डोंगराच्या पायथ्याशी लागलेली आग आटोक्यात आली. दरम्यान, डोंगर माथ्यावर वणवा लागल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. मात्र, डोंगरावर अग्निशमन दलाचा बंब पोहचू शकत नसल्यामुळे आग्नशमन दल जवान माघारी फिरले. यावेळी पर्यावरण आणि पक्षी प्रेमी ज्योती नाडकर्णी तसेच त्यांचे दोन सहकारीडोंगरावर लावलेल्या रोपट्यां लगतची गवत काढत होते. त्या तिघांनी डोंगर माथ्यावर लागलेली आग रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास आटोक्यात आणली. तळोजा कारागृह लगत असलेल्या डोंगरावर पर्यावरण प्रेमींनी लावलेली रोपटी आगी पासून सुरक्षित आहेत. मात्र, पावसाळ्यात डोंगरावर उगवलेली नैसर्गिक रोपटी जळून खाक झाली. तिघांनी आग आटोक्यात आणली नसती तर ओवे डोंगरावर लागलेला वणवा आटोक्यात आले नसता. त्यामुळे हजारो झाडे जळून खाक झाली असती. पुन्हा डोंगर परिसरात वणवा पेटू नये म्हणून गवत कापणीचे काम सुरु करण्यात आले आहे, अशी माहिती ज्योती नाडकर्णी यांनी दिली.

## पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीची आढावा बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीची आढावा बैठक काँग्रेस भवन येथे संपन्न झाली.प्रभारी माजी आमदार हुस्नबानू खलिफे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत जिल्हा कमिटी चे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीत सह प्रभारी दीपक शर्मा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भाई आर सी घरत यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.आपल्या प्रास्ताविकपर भाषणात ते म्हणाले की केंद्रातील भारतीय जनता पक्षाच्या सरकारने कृत्रिमरित्या महागाई वाढवून देशाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त केली आहे.यासाठीच अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार तसेच प्रांताध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशानुसार पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती दिना–पासून ते २९ नोव्हेंबर पर्यंत राज्यभर जनजागरण अभियान राबविण्यात येणार आहे.

या अभियानात पदयात्रा काढून कृत्रिम महागाईचा निषेध करण्यात येणार आहे. तसेच गावखेड्यात जाऊन दुर्गम वस्त्यांवर जाऊन केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणाबाबत कार्यकर्ते नागरिकांना अवगत करतील.

हुस्नबानू खलिफे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या की सगळ्यांनी एकदिलाने काम करणे गरजेचे आहे. जनजागरण अभियान राबविताना जास्तीत जास्त कार्यकर्ते जोडणे हेदेखील आपल्याला पाहायचे आहे.इतक्या मोठ्या प्रमाणात पदाधिकार्यांची उपस्थिती पाहून मला फार आनंद झाला.आजची सभा कार्यालयात झाली याच्या पुढची हॉलमध्ये होईल आणि त्याच्या पुढच्या सभेला मैदान घ्यावे लागेल असा मला विश्वास वाटतो.

हुस्नबानू खलिफे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या आढावा बैठकीला सह प्रभारी दीपक शर्मा,पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष आर सी घरत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष कॅप्टन कलावत,ज्येष्ठ नेते जी आर पाटील, माजि रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष अनंत पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी महिला सेल सदस्य निर्मला म्हात्रे, जिल्हा मागासवर्गीय सेल अध्यक्ष माया अहिरे, पनवेल अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे उपाध्यक्ष अरविंद सावळेकर,जिल्हा सरचिटणीस मल्लीनाथ गायकवाड, जिल्हा ओबीसी सेलचे अध्यक्ष वैभव पाटील, उत्तर रायगड जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस डॉक्टर सेलचे उपाध्यक्ष डॉक्टर अमित भक्तिकुमार दवे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस कमिटी सरचिटणीस आदित्य सावळेकर, पनवेल पंचायत समितीचे माजी उपसभापती वसंत काठावले, माजी नगरसेविका शशिकला सिंग,रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष गणेश म्हात्रे,माजी नगरसेवक लतीफ शेख यांच्या सह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.संपत काशिनाथ सावंत आणि मयुर संपत सावंत रा.रुम नं.६०४, सहावा मजला, ट्रिविंस मार्वल, प्लॉट नं.ए–२२, सेक्टर–१२, खारघर मुंबई यांनी खालील वर्णनाची मिळकत श्री.गणेश गणपत वाघमारे यांचेकडून विकत घेतली आहे. आणि श्री.गणेश गणपत वाघमारे यांनी सदर मिळकत जेकेबी कंस्ट्रक्शन तर्फे काकवानी ओमप्रकाश केवलराम यांचेकडून नोंदणीकृत दस्त ऐवज क्र.०३५९४/२००५, पावती क्र.०३५९३/२००५, दिनांक ०८/०४/२००५ रोजीचा उरण अशा दस्ताने विकत घेतली होती. खालील नमूद मिळकतीचे मुळ कागदपत्रे आमचे अशिल यांचे कडून गहाळ झाली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**शॉप नं.२७, तळमजला, ओशिएन व्ह्यु कॅस्टल, प्लॉट नं.बी–११०, सेक्टर–१२, खारघर, जि.रायगड**

१) श्री.गणेश गणपत वाघमारे व विकासक जेकेबी कंन्स्ट्रक्शन यांचेमध्ये झालेला दिनांक ०८/०४/२००५, रोजीचा दस्त ऐवज क्र.०३५९४/२००५, पावती क्र.०३५९३/२००५, करारनामा २) अलॉटमेंट लेटर ३) ताबा पावती

त्या संदर्भात आमचे अशिलांनी खारघर येथे दि.१३/११/२०२१ रोजी तक्रार केली आहे. त्याचा तक्रार क्र.२०४२/२०२१ असा आहे.

तरी याबाबत कोणाही व्यक्तीस वरील कागदपत्रे आढळल्यास खालील पत्यावर कागदपत्रासहीत समक्ष भेटावे.

दि.१३/११/२०२१

**सही/–**
**ॲड.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, प्रभात सेंटर,**
**सेक्टर–१ ए, सी.बी.डी. बेलापूर**
**मो.नं.८३६९०१७३६३**

मा.गोडसे साहेब

अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.३ रे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१५०३/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०३/१२/२०२१

१) श्री.आत्माराम रघु नाईक, वय : ५६ वर्षे
रा.कोल्ही कोपर, पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड
२) कानुबाई रघु नाईक उर्फ
सौ.सविता छत्रपाल चौहान, वय : ५४ वर्षे,
रा.धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.सुमन शालिक म्हात्रे, वय : ७२ वर्षे
रा.कोल्ही कोपर, पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.जानकुबाई रघु नाईक ह्या दि.०२/०८/२००७ रोजी मौजे : कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या भूखंडाबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी, अर्ज केलेला आहे.

**जमिनींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|
| पारगांव डुंगी–१९६ | २३ | १० | ०–४२–५ |
| | २४ | ३० | ०–०६–७ |
| | २५ | १/३ | ०–१७–७ |
| | २९ | १६ | ०–०९–२ |
| पारगांव डुंगी–१३९ | ५५ | १३ | ०–०२–० |
| | ६१ | ४ | ०–०२–० |

सदर मिळकतींचे संपादनाच्या मोबदल्यात खालील वर्णनाचा भूखंड वाटप झालेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| नोड | भूखंड क्रं. | सेक्टर नं. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर–दापोली | १०९ | ८ | १२०० |

अर्जदार हे कै.जानकुबाई रघु नाईक यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.१३/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.शुभांगी पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.पनवेल यांचे न्यायालयात

चौ.अर्ज नं.१४७३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/१२/२०२१

कै.संजयकुमार ओंकार सिंह मयत तर्फे वारस
१) श्रीमती.रागिणी संजयकुमार सिंह
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.उमंग संजयकुमार सिंह
अ.पा.क.आई
श्रीमती.रागिणी संजयकुमार सिंह
वय : १ वर्षे ९ महिने
रा.सिद्धीविनायक इन, जे. विंग, १०२,
पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जदार क्र.१ चे पती व २ चे वडील कै.संजयकुमार ओंकार सिंह हे दि.२१/०४/२०२१ रोजी मृत्यू पावले असून त्यांचे नेहमीचे राहण्याचे ठिकाण वरीलप्रमाणे असून ते येथील कायमचे रहिवासी होते. मृत्यूसमयी त्यांचे नावावर स्वकष्टार्जित खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**१) मौजे : पळस्पे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**शॉप नं.१३, तळमजला, सिद्धीविनायक अपार्टमेंट, प्लॉट नं.२, पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड**
**२) मौजे : कोळखे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**शॉप नं.३ व ४, तळमजला, निवारा को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.१, कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड**

मयत कै.संजयकुमार ओंकार सिंह यांचे कायदेशीर वारसदार पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्रं. | वारसदाराचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती.रागिणी संजयकुमार सिंह | ३० | पत्नी |
| २ | कु.उमंग संजयकुमार सिंह | १ वर्षे ९ महिने | मुलगा |

वरील प्रमाणे मयत कै.संजयकुमार ओंकार सिंह यांचे कायदेशीर वारसदार आहेत व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/११/२०२१
ठिकाण : पनवेल

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### सावधान नोटीस

आमचे अशिल श्री.विक्रम बंडोपंत मोहिते रा.नेरुळ, नवी मुंबई व श्री.अविनाश अशोक कोंडे रा.करंजाडे, ता.पनवेल यांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांचे सांगणेवरुन मी ॲड.संतोष बाबुराव भगत तमाम जनतेस या सावधान नोटीसीद्वारे सावधान करीतो की,

आमचे अशिल यांनी श्री.संतोष पदू काथारा व इतर राहणार मौजे : नेवाळी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांचे मालकी हक्कातील व ताबेकब्जात असलेल्या जमीन मिळकतीचे बाबत दिनांक २० मे २०२१ रोजी जमीन विक्रीचा समजोता करार केला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नेवाळी, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्वे नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकारणी (रु.पै.) | वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | १२/६ | ००.०१.०० | ००.०३ | १ |
| २ | १७/२ | ००.०१.८० पो.ख.००.००.२० | ००.०६ | १ |
| ३ | १७/४ | ००.०१.७० पो.ख.००.००.९० | ००.०६ | १ |
| ४ | ४/अ/५ | ००.०१.२० पो.ख.००.०१.८० | ००.१९ | १ |
| ५ | ४०/७ | ००.०२.८० | ००.२८ | १ |
| ६ | ८/६ | ००.०२.८० पो.ख.००.०२.३० | ०.४४ | १ |
| ७ | १८/१३ | ००.१८.३० पो.ख.००.०१.३० | २.८१ | १ |
| ८ | २२/५१ | ००.१४.०० पो.ख.००.०२.०० | ००.४१ | १ |
| ९ | २६/७ | ००.०८.८० पो.ख.००.००.८० | १.६९ | १ |

अशा प्रकारे आमचे अशिल यांचे सदर जमीन मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध निर्माण झालेले आहेत व ते अबाधित आहेत. आमचे अशिल यांनी सदर जमिनीचे बाबत ठरलेल्या व्यवहाराप्रमाणे उर्वरित रक्कम देण्यासही तयार आहेत. परंतु, आमचे अशिल यांना असे समजले आहे की, सदर जमीन मालक श्री.संतोष पदु काथारा व इतर हे अधिक लाभाच्या हेतूने सदर जमीन मिळकत ही इतर त्रयस्थ व्यक्तीच्या लाभात विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत.

वरील घडामोडीचा अनुषंगाने आमचे अशिल हे त्यांचा हक्क व हितसंबंध प्रस्थापित होण्याकरिता व स्वतःची फसवणूक टाळण्याकरिता योग्य ती दिवाणी तसेच फौजदारी कारवाई करतील परंतु यापुढे इतर कोणाचीही फसवणूक होवू नये या अनुषंगाने तमाम जनतेस सावध करतात की सदर उल्लेखित जमीन मिळकतीबाबत इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीने सदर जमीन मालक श्री.संतोष पदु काथारा व इतर यांच्याशी खरेदी विक्री, गहाण, बक्षिसदान, बोजा, साठेकरार, विकसनकरार तसेच हक्कसोडपत्र किंवा इतर कोणताही व्यवहार करू नये याउप्परही कोणत्याही व्यक्तीने कोणताही बेकायदेशीर व्यवहार केल्यास त्यामुळे होणाऱ्या नुकसानीस आमचे अशिल जबाबदार असणार नाहीत. त्यासंबंधित व्यवहार करणाऱ्या व्यक्तीवर देखील नाईलाजस्तव दिवाणी तसेच फौजदारी कारवाई करावी लागेल. व त्यासंबंधी होणाऱ्या खर्चाची व परिणामांची जबाबदारी हितसंबंधित व्यक्ती यांचेवर राहील याची स्पष्ट नोंद घ्यावी म्हणून जाहीर सावधान नोटीस देत आहेत.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १३/११/२०२१

**सही/–**
**ॲड.संतोष बाबुराव भगत**
**पत्ता : शॉप नं.१८, इंद्राआंगण सोसायटी, सेक्टर–९, प्लॉट नं.२, खांदा कॉलनी, पनवेल, रायगड–४१०२०६**

राव साहेब

अर्जदारांकरिता ॲडव्होकेट : ॲड.उदय प्र. मोकल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१५३६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/१२/२०२१

(कै.वैजयंता उर्फ वैजंता शिवराज काकडे यांचे कायदेशीर वारस)
१) सौ.प्रतिभा श्रीकांत मोतीलिंग (मुलगी)
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.१६०४, प्लॉट नं.१९, सेक्टर नं.०६,
मंगलमुर्ती को.ऑप.हौ.सोसायटी, खांदा कॉलनी,
ता.पनवेल, जि.रायगड, पिन कोड–४१०२०६
२) श्री.शिवराज भिकाजी काकडे (पती)
वय : ७० वर्षे, धंदा : काही नाही
३) कुमार.स्वर्निम अश्विन काकडे (नातू)
वय : ०४, धंदा : शिक्षण तर्फे
अज्ञान पालनकर्ता आजोबा
श्री.शिवराज भिकाजी काकडे
अर्जदार क्रं.२ व ३ रा.फ्लॅट नं.४१,
रसुल जीवा चाळ नं.५६, साने गुरुजी मार्ग,
सात रस्ता, जेकब सर्कल, मुंबई पिन कोड–४०००११ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.वैजयंता उर्फ वैजंता शिवराज काकडे, यांचे निधन दि.२२/०४/२०२० रोजी राहत्या घरी पनवेल येथे झालेले आहे. कै.वैजयंता उर्फ वैजंता शिवराज काकडे यांच्या मृत्यू पश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै.वैजयंता उर्फ वैजंता शिवराज काकडे कायदेशीर वारस आहेत.

३) अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.वैजयंता उर्फ वैजंता शिवराज काकडे व श्री.शिवराज भिकाजी काकडे यांनी मौजे : पालेबुद्रुक, ग्रुप ग्रामपंचायत पालेबुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित निवासी सदनिका खरेदी केलेली आहे.

**सदनिकेचे वर्णन**

**मौजे : पालेबुद्रुक, ग्रुप ग्रामपंचायत पालेबुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथील निवासी सदनिका**
**बिल्डींग नं.३०,**
**बिल्डींगचे नाव : निसर्ग**
**फ्लॅट नं.१०,**
**दुसरा मजला,**
**सर्वे नंबर : १३२/२, १३८/२, व १३७/१**
**क्षेत्रफळ : ४०४ चौ.फूट**

सदरवरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १३/११/२०२१

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## कामोठेत साडेतीन लाख रुपयांची लूट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बँकेतून काढलेली ३ लाख ५० हजारांची रोख रक्कम घेऊन जाणार्या व्यक्तीच्या हातातील रोख रक्कमेची पिशवी मोटारसायकलवरुन आलेल्या दोघा लुटारूंनी लुटून पलायन केल्याची घटना कामोठे सेक्टर-२१ मध्ये घडली. कामोठे पोलिसांनी या घटनेतील दोघा अज्ञात लुटारु विरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील तक्रारदार रंगनाथ दाते (४५) हा कामोठे सेक्टर-८ मध्ये कुटुंबासह राहण्यास असून त्याचा सेक्टर-२१ मध्ये मनी ट्रान्सफरचा व्यवसाय आहे. दाते याने आपल्या व्यावसायासाठी बँकेतून ३ लाख ५० हजार रुपये काढले हेते. त्यानंतर सदरची रक्कम घेऊन तो कारमधुन आपल्या ऑफिस जवळ पोहोचल्यानंतर रोख रक्कमेची पिशवी घेऊन तो कार्यालयाच्या दिशेने जात होता. याचवेळी मोटारसायकलवरुन आलेल्या दोघा लुटारुंनी त्याच्या हातातील ३ लाख ५० हजाराची रोख रक्कम असलेली पिशवी जबरदस्तीने लुटून पलायन केले. यावेळी दाते याने आरडा-ओरड करत सदर लुटारूंचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत दोघे लुटारु एम.एन.आर.कॉलेजच्या दिशेने भरधाव वेगात पळून गेले. या घटनेनंतर रंगनाथ दाते याने कामोठे पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

# नागोठणे हे आमचे माहेर घर आहेच राष्ट्रवादीचा बालेकिल्ला देखील आहे : खा. सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । वाकण**




विकासाचे कामे, रोजगाराचे प्रश्न आपण सोडविणार आहोतच परंतु भविष्याच्या कालावधीत आपण अधिकच चांगले काम कसे करता येईल याचाही आपल्याला प्रयत्न करायचा आहे. येणाऱ्या निवडणुकांमध्ये आपल्याला आपली ताकद व शक्ती दाखवायची आहे. मागील निवडणुकीचे शल्य मनामध्ये न ठेवता आघाडी असो वा नसो येणाऱ्या निवडणुकीमध्ये विजय मिळावा असा आदेश रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी कार्यकर्त्यांना दिला तसेच नागोठणे हे आमचे माहेर घर असून नागोठण्याशी आमचे तीन पिढ्यांचे स्नेहसंबंध आहेत तसेच नागोठणे हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला देखील असल्याचे यावेळी खा. तटकरे यांनी सांगितले. दरम्यान नागोठणे शुद्ध पाणी पुरवठा योजना मी विशेष बाब म्हणून मंजूर करुन घेतली. मी पालकमंत्री नसतो तर ही योजना मंजूर झालीच नसती असे स्पष्ट प्रतिपादनही यावेळी खा. सुनील तटकरे यांनी केले.

नागोठणे विभाग व शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा जाहीर मेळावा नागोठणे जवळील आंबेघर वेलशेत येथे शुक्रवारी (दि. १२) सायंकाळी पार पडला यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना खासदार तटकरे बोलत होते. यावेळी आमदार अनिकेतभाई तटकरे, जिल्हा उपाध्यक्ष उदय जवके, युवक राष्ट्रवादीचे रोहा तालुका अध्यक्ष जयवंत मुंढे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागीय नेते भाई टके आदींसह प्रमुख कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

खा. सुनील तटकरे पुढे म्हणाले की, संपूर्ण जिल्ह्यात महिलांचे विभागवार मेळावे झाले पाहिजेत त्यानिमित्त ५० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महिलांना सुद्धा ताकद निर्माण करण्याचे काम आपल्याला पुढील कालावधीमध्ये करायचे असून नागोठणे विभागात बूथ कमिट्या नेमून प्रत्येक ग्रुपवर आपला कार्यकर्ता असला पाहिजे याचा विचार करून भविष्याची वाटचाल करा. काही भागामध्ये आपल्याला यश का मिळत नाही याचे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. उद्याच्या कालावधीत आपल्या काय उणिवा राहिल्या असतील, कुठे काय चुकले असेल, कुठे कामाच्या बाबतीत कमी पडलो असेल याचे आत्मपरीक्षण करून यापुढे आपण कुठेही कमी पडता कामा नये याची खबरदारी घेऊन आपण काम करण्याचा प्रयत्न केला तर आपल्या राष्ट्रवादी पक्षाला रोखू शकण्याची ताकद कुणामध्येही राहणार नाही असे मोलाचे मार्गदर्शन यावेळी खासदार तटकरे यांनी केले. ते पुढे म्हणाले की, आता नागोठणे शहरातील मिरानगर भागातील पुनर्वसनाचा प्रश्न आपण हाताळणार आहोत. तसेच नागोठणे उर्दू शाळेसाठी सीएसआर फंडाच्या माध्यमातून १० लाख रुपये मंजूर केले असल्याचे सांगून शहरातील वेगवेगळ्या विकासकामांना कशी गती देता येईल याचा प्रयत्न करणार आहोत. विचारपूर्वक व योग्य पद्धतीने काम करण्याची मानसिकता दाखवून पक्षाला ताकद व बळ देण्याचे काम करा असा सल्ला यावेळी खासदार तटकरे यांनी दिला. मेडिकल कॉलेजमुळे शिक्षण क्षेत्रात रायगडच्या इतिहासात मानाचा तुरा रोवला गेला याचा अभिमान असून यावर्षी १०० विद्यार्थी एम.बी.बी.एस.ला प्रवेश घेतील अशी माहिती शेवटी खासदार सुनील तटकरे यांनी यावेळी दिली. रोहा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नंबर एक आहेच परंतु नवी उभारी घेऊन नवा विचार घेऊन पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष रायगड जिल्ह्यात देखील नंबर एक करू असा विश्वास शेवटी खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला




## वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

### सर्वसमावेशक विकासासाठी खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रातील

# ३२ गावांचा विकास आराखडा तयार करण्याचा सिडकोचा इरादा जाहीर

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रासाठी ३२ गावे (रायगड जिल्ह्याच्या पनवेल तहसीलची ७ गावे आणि उरण तहसीलची २५ गावे) विकसित करण्यासाठी सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे. त्यानुसार सर्वसमावेशक व उत्तम दर्जाच्या सोयी सुविधांनी परिपूर्ण विकास करण्यासाठी खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रातील ३२ गावांचा विकास आराखडा तयार करण्याचा इरादा सिडकोने जाहीर केला आहे.

सिडकोने विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून खोपटा नव नगरातील ६ गावांसाठी (बारापाडा, कर्नाळा (तारा), डोलघर, साई, कासारभट, दिघाटी) विकास आराखडा तयार करून दिनांक ०३/०४/२००८ रोजी प्रकाशित केला होता. महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभागाच्या अधिसूचनेनुसार दिनांक ०४/०४/२०१२ रोजी खोपटा नव नगरातील ६ गावांसाठी विकास नियंत्रण नियमावलीसह विकास आराखड्यास मंजूरी दिली.

यानंतर महाराष्ट्र शासनाने ०२/०६/२०२१ रोजीच्या पत्रांद्वारे खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रातील उर्वरित २६ गावांचा विकास आराखडा तयार करून प्रकाशित करण्यासाठी सिडकोला निर्देश दिले होते.

खोपटा नवनगर अधिसूचित क्षेत्राच्या विकासाचे उद्दिष्ट पायाभूत आणि सामाजिक सुविधा प्रदान करणे व विकासाच्या विविध क्षेत्रात संधी निर्माण करणे आहे. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UD-CPR) नुसार खोपटा नव नगरतील ६ गावांच्या मंजूर विकास आराखडा तसेच उर्वरित २६ गावांचा तयार करण्यात येणारा विकास आराखडा परस्पर सुसंगत असावा यासाठी खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रातील उर्वरित २६ गावांचा विकास आराखडा तयार करीत असतांना ६ गावांच्या मंजूर असलेल्या विकास आराखड्याची फेरतपासणी करून त्यात बदल करण्याची आवश्यकता आहे.

या संदर्भातील सूचना सिडकोतर्फे प्रसिद्ध करण्यात आली असून सदर सूचना व नकाशाची प्रत सिडकोचे संकेतस्थळ http://cidco.maharashtra.gov.in येथे उपलब्ध करण्यात आली आहे.

> नव नगर अधिसूचित क्षेत्रातील ३२ गावांचा विकास आराखडा नव्याने तयार झाल्यानंतर निश्चितच खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्राचा उत्तम विकास होईल व हा परिसर सर्वसमावेशक व उत्तम दर्जाच्या सोयी सुविधांनी परिपूर्णरित्या विकसित झाल्यावर एक सुनियोजित शहर म्हणून नावारूपास येईल यात शंका नाही. त्याचप्रमाणे यामुळे विविध क्षेत्रात विकासाच्या सुवर्णसंधी उपलब्ध होतील.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक**

# एस.टी.संपाचा तळा बाजारपेठवर मोठा परिणाम



**दै.रायगड नगरी । तळा**

गेले दोन वर्ष संपूर्ण जगावर कोरोना महामारीचा राक्षस घुसखोरी करून सर्व उद्योग धंदा सह सर्वांना आर्थिक मंदीत लोटले आता थोडे फार स्थिर स्तरावर येत असताना महाराष्ट्राची जनवाहिनी ग्रामीण भागातील दळण वळणाचे एकमेव साधन असून राज्य परिवहन मंडळ अर्थात एस.टी. कामगारांनी राज्य सरकारात विलिनीकरणासाठी पुकारलेल्या संपामुळे त्याचा फटका तळा बाजारपेठेला बसला आहे. त्यामुळे बाजारपेठेत शुकशुकाट पसरला आहे.

तळा तालूका डोगंराळ दुर्गम असून एकमेव साधनच बंद असल्याने खरेदीसाठी येत नाहीत खाजगी वाहन चालक मालकांनी अवास्तव भाडे घेत असल्याने प्रवासासाठी बाहेर पडत नाहीत. मुबंई भाडे ७००ते ८०० घेऊन लय लूट चालू आहे तसेच खरेदीसाठी बाजारात येणे टाळत आहेत.

आर्थिक मंदीची टागती तलवार आहेच शेती एकमेव व्यवसाय असल्याने लहरीपणावर अवलंबून आहे.त्यात बिगर मोसमी पावसाने भातशेती फुकट गेली आहे. त्यामुळे आर्थिक मंदी आहे. दुकानदारानी दिपावलीसाठी माल भरला असुन गिर्हाईक नसल्याने पडून आहे. त्यामुळे व्यापारी चिंतेत पडले आहेत.

# शासकीय रुग्णालयासाठी पुन्हा ‘संघर्ष’

### 30 नोव्हेंबरपासून संघर्ष समिती तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली व खालापूर तालुक्यातील नागरिकांना चांगली आरोग्य सेवा मिळावी, यासाठी जेष्ठ पत्रकार पहिलवान हनुमंतराव ओव्हाळ अनेक वर्षापासून संघर्षरत आहेत. आंदोलन, मोर्चे व निवेदनाच्या माध्यामातून ते शासकीय रूग्णालय उभारण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. दोन महिन्यापूर्वी आंदोलन केल्यानंतर रूग्णालयाच्या कामाला वेग आला होता, पण पुन्हा काम थंडबस्त्यात गेल्याने दि. ३० नोव्हेंबरपासून रायगड संघर्ष समिती तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार आहे.




याबाबत सविस्तर वृत्त असे की, खालापूर येथील दहिवली बोरोटी या जागेत मंजूरी मिळाल्यानंतर रितसर मोजणी होऊनही शासनाकडून विलंब होत आहे. यासोबतच सुभाषनगर (खोपोली) येथे संरक्षण भिंत होण्याबाबत अनेक वेळा उपोषण करुन देखील शासनाचे व प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. शिळफाटा येथील ट्रामा सेटर दवाखाना अनेक वर्षे महिन्यांपासून धुळखात पडला आहे. ताकई रोड आरसीसी काम एमएमआरडीच्या तर्फे खोपोलीनगर परिषदेच्या वतीने अनेक महिन्यांपासून सुरु असताना प्रगती दिसत नाही, या सर्व विषयांकडे लक्ष वेधण्यासाठी दि. ३० नोव्हेंबरपासून रायगड संघर्ष समिती तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार आहे.

शासकीय रुग्णालय होण्यासाठी जेष्ठ पत्रकार पहिलवान हनुमंतराव ओव्हाळ, गोपीनाथ सोनवणे, खलिल सुर्वे, सतिष रावळ, माजी नगरसेवक राजु डूमने यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत संघर्ष समितीच्या वतीने तहसिल कार्यालयासमोर सकाळी ११ वाजता उपोषणाला बसण्याचा निर्णय घेण्यात आला.

# वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार २०२१ शिक्षक संजय होळकर यांना प्रदान

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र राज्य विधान परीषदेचे माजी उपसभापती स्वर्गीय वसंतराव डावखरे साहेब यांच्या स्मृतीप्रित्यर्थ कोकण पदवीधर मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार ॲड. निरंजन डावखरे यांच्या संकल्पनेने आणि प्रेरणेने व भाजपा शिक्षक आघाडीचे वतीने कोकण विभागांतर्गत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रज्ञावंत, गुणवंत व उपक्रमशील, सर्जनशील व प्रयोगशील प्राचार्य, उपप्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक व शिक्षक बंधुभगिनींना त्याचप्रमाणे शिक्षण संस्थाचालक व प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना संस्थाचालक यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देऊन गेल्या चार वर्षांपासून सन्मानित करण्यात येते. यावर्षी कोरोनाकाळाचा



विचार करता वसंतस्मृती आदर्शशिक्षक पुरस्कार-७६, वसंतस्मृती कोरोना वॉरीअर्स-२५, वसंतस्मृती आदर्श शिक्षण संस्थाचालक-०३, वसंतस्मृती आदर्श प्रधानमंत्री कौशल्य विकास संस्था-०१ यांना समारंभपुर्वक टीप टॉप प्लाझा हॉल ठाणे येथे मोठ्या उत्साहात प्रदान करण्यात येणार आला. यावेळी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोठीजुई ता. उरण जि.रायगड या शाळेचे उपक्रमशिल शिक्षक संजय जयराम होळकर यांना वसंतस्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार २०२१ ने गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख समारंभाध्यक्ष म्हणून कपिल पाटील-केंद्रीय राज्य मंत्री पंचायत राज समिती भारत सरकार, प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संजय केळकर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार विनयजी नातू, संदीप लेले, शेषराव बढे शिक्षणाधिकारी माध्य. ठाणे, माधवीताई नाईक, भाजप शिक्षक आघाडी नेते, कार्यकर्ते व कोकण विभाग सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षक बंधू भगिनी मान्यवर उपस्थित होते.

# यादव गवळी समाजाच्या खंडाळे येथील सभागृहासाठी १५ लाखांचा निधी

**दै.रायगड नगरी । वाकण**

रायगड, ठाणे, मुंबई व सोलापूर या चार जिल्ह्यांची एकत्रित संस्था असलेल्या यादव गवळी समाज संघटनेच्या अलिबाग तालुक्यातील खंडाळे येथील इमारतीच्या वस्तीगृहासाठी व सभागृहासाठी रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत १५ लाख रूपये निधीच्या मंजुरीचे पत्र खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते शुक्रवार दि. १२ नोव्हेंबरला नागोठण्याजवळील आंबेघर येथे संपन्न झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या विभागीय मेळाव्यात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी आ. अनिकेतभाई तटकरे, राष्ट्रवादीचे विभागीय नेते भाई टके, शिवरामभाऊ शिंदे, सदानंद गायकर आदींसह यादव गवळी समाजाचे रायगड जिल्हा अध्यक्ष राजेश मेहतर, उपाध्यक्ष विलास वालेकर, जिल्हा कार्यकारिणी सदस्य सुनील डबरे, राजेंद्र वरणकर, विष्णू महागावकर, शिक्षण समिती अध्यक्ष विलास चौलकर व समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

यादव गवळी समाजाच्या खंडाळे येथे होत असलेल्या या इमारतीसाठी यापूर्वीही तीन वर्षांपूर्वी खा. सुनील तटकरे यांनी त्यावेळी आपल्या आमदार निधीतून १० लाख रूपयांचा निधी दिला होता. त्यावेळी विद्यमान खा. सुनील तटकरे व आ. जयंतभाई पाटील यांच्या हस्ते यादव गवळी समाजाच्या या इमारतीच्या कामाचे भुमीपुजन संपन्न झाले होते अशी माहितीही शिक्षण समिती अध्यक्ष व नागोठण्याचे माजी सरपंच विलास चौलकर यांनी पत्रकारांना दिली.

# माथेरानमध्ये भर उन्हात रेल्वेचा उत्सव

### रेल्वेचे जनक सर आदमजी पिरभोय यांचा विसर ! पिरभोय वंशजांकडून तीव्र नाराजी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये सन २०२१ साठी मध्य रेल्वेच्या नॅरोगेज मिनिट्रेनला युनेस्को मध्ये स्थान मिळाल्यामुळे येथील रेल्वे स्टेशनच्या अंतर्गत परिसरात रेल्वे उत्सव साजरा करण्यासाठी एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन केले होते त्यासाठी नगरपरिषदेने सुध्दा खारीचा वाटा उचलला होता.



रेल्वेचा उत्सव हा खऱ्या अर्थाने मोठया उत्साहाने आणि आनंदात साजरा करणे अपेक्षित होते कारण या दोन्ही दिवस चालणाऱ्या उत्सवासाठी मुख्य अतिथी रेल्वेचे अपर महा प्रबंधक बी.के.दादाभोय, विशेष अतिथी व्यवस्थापक शलभ गोयल, प्रधान मुख्य अभियंता ए.के.गुप्ता यांसह अन्य प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या सोबत नगरपरिषदेचे भारतीय जनता पक्षाचे काही मोजकेच लोकप्रतिनिधी सुध्दा यावेळी आवर्जून हजर राहिले होते.परंतु हा कार्यक्रम आयोजित करताना कुठल्याही प्रकारचे नियोजन केले गेले नसल्यामुळे पर्यटकांचा भ्रमनिरास झाला. भर उन्हात अपुरी आसनव्यवस्था त्याचप्रमाणे व्यासपीठावर जी प्रतिष्ठित मंडळी आपले विचार प्रकट करण्यासाठी निमंत्रित होती त्यांना सुध्दा उन्हाच्या त्रासाने कमी शब्दात आपले भाषण आटोपावे लागले. कार्यक्रमास येणाऱ्या लोकांना, पर्यटकांना सुध्दा साधी पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करण्यात आली नाही. मंडप जेमतेम बांधण्यात आला होता त्यामुळे अनेकांना झाडाखाली सावलीचा आधार घ्यावा लागला. रेल्वेच्या संबंधीत ज्या प्रतिष्ठित व्यक्ती येणार त्यासाठी काही दिवसांपासून अमन लॉज स्टेशन पासून माथेरान रेल्वे स्टेशन पर्यंत पथदिवे तसेच रंगरंगोटी करण्यात आली होती. माथेरान स्थानकात रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या, सर्व भिंतींना रंगीत करून त्या सुध्दा बोलक्या बनविण्यात आल्या. या सर्व रेल्वेच्या प्रतिष्ठित मान्यवर मंडळींसाठी खासकरून कोळशाच्या इंजिनाच्या सहाय्याने नेरळ येथून प्रवास घडविण्यासाठी रेल्वेच्या कामगारांना मेहनत घ्यावी लागली. स्टेशन भागात वन विभाग आणि संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून माहिती स्टॉल उभारण्यात आला. तर नगरपरिषदेने स्वच्छ सर्व्हेक्षण २०२२ बाबतीत माथेरान हे कचरा व्यवस्थापन बाबतीत झिरो लँडफील क्षेत्र असल्याची पत्रके यावेळी येथील स्टॉलवर मोफत वाटप केली.